**सं. फौ. खं. क्र. ३५९/२०२१**
**सरकार वि. संजय**
**नि. १९**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – राजु किसन उर्फ क्रिष्णा मेश्राम
वय – ४२ वर्ष धंदा – शेती
पत्ता – वाघोली, कन्हान, जि. नागपूर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील कु.आर.व्ही. चरडे यांचे कडून सुरु**

पोलीसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स दिला नव्हता. आता मला समन्स दाखविला त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहिती नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहिती नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविला त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की दिनांक २५.१२.२०२० रोजी पोलीसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स दिला होता. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी मला येसंबा येथे पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. गजवे यांच्यातर्फे.**

**नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/–
**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –१९/०८/२०२३